सकाळ ॲग्रोवन

नांदेड, सोमवार, ९ डिसेंबर २०२४

# जमिनीत सूक्ष्म जिवाचा अधिवास वाढविण्याची गरज : कळसाईत

## पोखर्णी कृषी विज्ञान केंद्रात जागतिक मृदा दिन साजरा

ॲग्रोवन वृत्तसेवा

नांदेड : रासायनिक खताचा अतिवापर टाळून जमिनीमध्ये जैविक सूक्ष्म जिवाचा अधिवास वाढविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले.

जागतिक मृदा दिनानिमित्त जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड, जिल्हा मृद् सर्वेक्षण व मृद् चाचणी अधिकारी व कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी (ता. नांदेड) येथे शुक्रवारी (ता. ६) मृदा दिनानिमित्त कार्यक्रम झाला. या वेळी ते बोलत होते. नांदेड तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख, डॉ. महेश अंभोरे, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद् चाचणी अधिकारी प्रकाश पल्लेवाड उपस्थित होते. जैविक संघ, ट्रायकोडर्मा, मेटाराझियम, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क आदी सूक्ष्मजीव व जैविक घटकांचा वापर करावा. जमिनीचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी एकात्मिक अन्न द्रव्य व्यवस्थापन, मिश्रपीक पद्धती, आंतर पीक पद्धती महत्त्वाची आहे, असे कळसाईत म्हणाले. डॉ. देविकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांनी रासायनिक खते व औषधे यांचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा कार्यक्षम वापर करावा. मृदेचे आरोग्य व जैव विविधता जोपासावे असे सांगितले.

प्रा. संदीप जायभाये यांनी शेतकऱ्यांनी मृदा परीक्षण अहवालाप्रमाणे पिकांना खताच्या मात्रा द्याव्यात असे सांगितले. डॉ. महेश अंभोरे यांनी मृदा दिनाचे महत्त्व सांगून हा दिवस साजरा करण्याचा उद्देश स्पष्ट केला. प्रा. पवळे यांनी मृदेचे आरोग्य चांगले राहण्यासाठी मृद परीक्षण करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

या वेळी दत्तकुमार कळसाईत यांच्या हस्ते शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिकीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रकाश पल्लेवाड, कृषी पर्यवेक्षिका ज्योती शिंदे, कृषी सहायक सोनवणे, एस. एस. गुप्ता, दत्तात्रय चिंतावार, गजानन पडलवार, राहुल जाधव, जावेद शेख, मोहन बेरजे, सुनील कराळे, एम. ए. पठाण आदींनी परिश्रम घेतले.